# अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

## रोजगार सूचना

### नामनिर्देशनाची रिक्त पदे भरतीबाबतची जाहिरात

अर्थ व सांख्यिकी संचालक, मुंबई हे मुख्य कार्यालय, मुंबई, अधिनस्त कार्यालये यातील तसेच नियुक्ती प्राधिकाराखालील नामनिर्देशनाची रिक्त असलेली खालील पदे भरण्याकरीता निवड सूची व प्रतिक्षा सूची तयार करण्यासाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून दिनांक ९/११/२०१२ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागवित आहेत.

| अ. क्र. | पदाचे नाव, वेतनबँड व ग्रेड वेतन | अ.जा. SC | अ.ज ST | वि.जा. (अ) VJ (A) | भ. ज. (ब) NT (B) | भ. ज. (क) NT(C) | भ.ज. (ड) NT(D) | वि. मा. प्र. S.B.C. | इ. मा. व. O.B.C. | सर्व साधारण Open | एकूण Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **संशोधन सहायक, गट-ब (अराज.)** [रु.९३०० - ३४८०० + ४३००] | ८ | ४ | २ | २ | २ | १ | १ | ११ | २८ | ५९ |
| २ | **सांख्यिकी सहायक, गट-क** [रु.५२०० - २०२०० + २८००] | २३ | १२ | ५ | ४ | ६ | ४ | ४ | ३३ | ८४ | १७५ |
| ३ | **अन्वेषक गट-क** [रु.५२०० - २०२०० + २०००] | १० | ५ | २ | २ | ३ | १ | २ | १५ | ३७ | ७७ |
| ४ | **लिपिक टंकलेखक, गट-क** [रु.५२०० - २०२०० + १९००] | ६ | ३ | २ | १ | २ | १ | १ | ९ | २४ | ४९ |
| ५ | **वाहनचालक गट-क** [रु.५२०० - २०२०० + १९००] | ३ | २ | १ | १ | १ | - | - | ४ | १० | २२ |
| ६ | **चपराशी, गट-ड** [रु.४४४० - ७४४० + १३००] | २ | १ | १ | - | १ | - | - | ३ | ७ | १५ |

शैक्षणिक अर्हता, अतिरिक्त आवश्यक अर्हता, वय, पात्रता, अर्जाचा विहीत नमुना, अर्ज करावयाची पद्धत, परीक्षा शुल्क, आरक्षण इतर अतिरिक्त माहिती व सूचना या संदर्भातील तपशील अर्थ व सांख्यिकी संचालनालयाचे संकेतस्थळ http://mahades.maharashtra.gov.in महाराष्ट्र शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in व रोजगार व स्वयंरोजगार संचालनालयाचे संकेतस्थळ http://ese.mah.nic.in वर उपलब्ध आहे. वाहनचालक व चपराशी पदाच्या उमेदवारांनी जाहिरात व विहीत नमुन्यातील अर्ज उपरोक्त संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घ्यावा. सदर पदांची संख्या कमी / जास्त होण्याची तसेच आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे.

संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपिक टंकलेखक पदाच्या उमेदवारांनी वरील नमूद केलेल्या संकेतस्थळावरून दिलेल्या सूचनेप्रमाणे **On Line** पध्दतीने अर्ज करावा.

संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

**टीपः** संचालनालयाच्या दिनांक ४/३/२०१२ रोजी प्रसिध्द झालेल्या मागासवर्गीयांच्या अनुशेषाची पदे भरतीबाबत दिलेल्या जाहिरातीस अनुसरून ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, लिपिक टंकलेखक व चपराशी पदाकरीता अर्ज भरले असतील त्यातील **पात्र** उमेदवारांना पुन्हा नव्याने अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने **पात्र** / **अपात्र** ठरलेल्या व विहित मुदतीनंतर / विलंबाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. अर्ज केलेल्या उमेदवारांनी आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी.

## संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपिक टंकलेखक पदाकरीता
## ऑन लाईन अर्ज करण्याची पध्दत :-

1) उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने परीक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज व माहिती http://ese.mah.nic.in http://mahades.maharashtra.gov.in www.maharashtra.gov.in. या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. खाली दर्शविलेल्या लिंकवर ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for online application are available on the link below.) http://ibpsreg.sifyitest.com/desoct12/

२) उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करून अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा फोटो (रुंदी ३.५ से.मी. x उंची ४.५ सें.मी.) व स्वत:चा ई मेल आयडी असणे आवश्यक आहे. स्वत:चा विहित आकारातील फोटो व स्वाक्षरी स्कॅन करून अपलोड करावी. याकरीता एका पांढ-या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. तसेच विहित आकारामध्ये काळया शाईच्या पेनने चौकोनात स्वाक्षरी करावी. फोटोवर स्वाक्षरी करू नये अथवा फोटो साक्षांकित (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा, स्टॅपल अथवा पिनिंग करू नये. फक्त फोटो स्कॅनरवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण ईमेज स्कॅन करून jpg फॉर्मेटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो व स्वाक्षरीची दोन्हीची मिळून संपूर्ण ईमेज ५० kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colours, etc. द्वारे स्कॅनींगच्या वेळी Setting Adjust करावे. खाली दर्शविलेल्या लिंकवर फोटो व स्वाक्षरी (सही) अपलोड करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. (Guidelines for uploading the photograph and Signature are available on the link below.) http://ibpsreg.sifyitest.com/desoct12/

३) उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये रोखीने परीक्षा शुल्क भरणे बंधनकारक आहे. त्यासाठी आवश्यक असलेले विहित नमुन्यातील चलनाची प्रत जाहिरातीमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. भारतीय स्टेट बँकेमध्ये रकमेचा / शुल्काचा भरणा केल्यानंतर बँकेकडून उपलब्ध करून देण्यात आलेला ट्रान्झॅक्शन आयडी (Transaction ID) अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.

४) उमेदवारांनी खाली दर्शविल्याप्रमाणे परीक्षा शुल्क भारतीय स्टेट बँकेमध्ये रोखीने भरावयाचे आहे. सदर शुल्क हे रोख स्वरूपातच भरणे आवश्यक आहे व ते **ना परतावा** राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही. **माजी सैनिक उमेदवारांना फी भरण्यापासून सूट देण्यात आली आहे.**

संशोधन सहायक /सांख्यिकी सहायक /अन्वेषक पदाकरीता

| | |
|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | रु. ४००/- |
| मागासवर्गीय उमेदवार | रु. २००/- |

लिपिक टंकलेखक पदाकरीता

| | |
|---|---|
| खुल्या प्रवर्गातील उमेदवार | रु. ३००/- |
| मागासवर्गीय उमेदवार | रु. १५०/- |

५) संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपिक टंकलेखक पदाकरीता विहित नमुन्यातील ऑनलाईन अर्ज संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिनांक १९-१०-२०१२ ते ९-११-२०१२ या कालावधीत उपलब्ध राहतील. सदर अर्ज स्वीकारण्याची अंतीम तारीख ९-११-२०१२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत राहील. उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्वीकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावी.

६) अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी / विवरणेच ग्राहय धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती / विवरणपत्रे ग्राहय धरण्यात येणार नाहीत.

७) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर दाखला, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकल्पग्रस्ताचा दाखला, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची प्रत इत्यादि प्रमाणपत्राच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती आणि बँक चलनाची संचालनालयाची प्रत सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे.

८) अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रामधील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

९) शासकीय / निमशासकीय महामंडळ कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत मुलाखतीच्या वेळी सादर करावी.

# अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

## नामनिर्देशनाने पदे - भरती जाहिरात

अर्थ व सांख्यिकी संचालक, मुंबई हे मुख्य कार्यालय, मुंबई, अधिनस्त कार्यालये यातील तसेच नियुक्ती प्राधिकाराखालील नामनिर्देशनाची खालील रिक्त पदे भरण्याकरीता निवड सूची व प्रतिक्षा सूची तयार करण्यासाठी इच्छूक व पात्र उमेदवारांकडून दिनांक ९/११/२०१२ पर्यंत विहित नमुन्यात अर्ज मागवित आहेत.

**पदांचा तपशील :**

| अ. क्र. | संवर्ग | अ. जा. | अ. ज. | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | संशोधन सहायक [Rs. ९३०० - ३४८०० + ४३००] | ८<br>(२*) | ४<br>(१*) | २<br>(१*) | २<br>(१*) | २<br>(१*) | १ | १ | ११<br>(३*)<br>(१©) | २८<br>(८*)<br>(१©)<br>(१π) | ५९ |
| २ | सांख्यिकी सहायक [Rs. ५२०० - २०२०० + २८००] | २३<br>(१@)<br>(७*)<br>(१©)<br>(३#)<br>(२!) | १२<br>(४*)<br>(१©)<br>(२#)<br>(१!) | ५<br>(२*)<br>(१#)<br>(१!) | ४<br>(१*)<br>(१#) | ६<br>(१@)<br>(२*)<br>(१#)<br>(१!) | ४<br>(१*)<br>(१#) | ४<br>(१*)<br>(१#) | ३३<br>(१@)<br>(१०*)<br>(२©)<br>(५#)<br>(३!) | ८४<br>(२@)<br>(२५*)<br>(४©)<br>(१३#)<br>(९!) | १७५ |
| ३ | अन्वेषक [Rs. ५२०० - २०२०० + २०००] | १०<br>(१£)<br>(३*)<br>(१©)<br>(२#)<br>(१!) | ५<br>(२*)<br>(१#)<br>(१!) | २<br>(१*) | २<br>(१*) | ३<br>(१*)<br>(१#) | १<br>(१*) | २<br>(१*) | १५<br>(१£)<br>(१@)<br>(५*)<br>(१©)<br>(२#)<br>(२!) | ३७<br>(२£)<br>(१@)<br>(११*)<br>(२©)<br>(५#)<br>(४!) | ७७ |
| ४ | लिपिक-टंकलेखक [Rs.५२०० - २०२०० + १९००] | ६<br>(१£)<br>(२*)<br>(१#)<br>(१!) | ३<br>(१*)<br>(१#) | २<br>(१*) | १ | २<br>(१*) | १ | १ | ९<br>(१£)<br>(१@)<br>(३*)<br>(१©)<br>(१#)<br>(१!) | २४<br>(१£)<br>(१@)<br>(७*)<br>(१©)<br>(४#)<br>(२!) | ४९ |
| ५ | वाहनचालक [Rs.५२०० - २०२०० + १९००] | ३<br>(१*) | २<br>(१*) | १ | १ | १ | - | - | ४<br>(१*)<br>(१#) | १०<br>(३*)<br>(२#)<br>(१£)<br>(१@) | २२ |
| ६ | चपराशी [Rs. ४४४० - ७४४० + १३००] | २<br>(१*) | १ | १ | -- | १ | -- | -- | ३<br>(१#)<br>(१@)<br>(१*) | ७<br>(१£)<br>(२@)<br>(२*)<br>(१#)<br>(१!) | १५ |

£ = प्रकल्पग्रस्त    @ = भूकंपग्रग्रस्त    * = महिला राखीव    © = खेळाडू
# = माजी सैनिक    ! = अंशकालीन उमेदवार    π = अपंग-श्रवणशक्तीतील दोष

**टिप :-** अ) वरील जाहिरातीत नमूद केलेली पदे ही भरतीवर निर्बंध नसलेल्या संवर्गातील आहेत.

ब) समांतर आरक्षणामध्ये पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या त्या सामाजिक प्रवर्गातून पदे भरण्यात येतील.

क) पदाच्या संख्येत व आरक्षणामध्ये बदल होऊ शकतो. निवड यादीमध्ये नाव असले तरी उमेदवारांना नियुक्तीबाबत हक्क सांगता येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

ड) संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपिक-टंकलेखक पदासाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया व परीक्षा पूर्णपणे on-line स्वरुपात घेण्यात येईल

इ) वाहनचालक व चपराशी पदाकरीता भरती प्रक्रिया व परीक्षा पूर्णपणे off-line स्वरुपात घेण्यात येईल.

फ) विमुक्त जाती / भटक्या जमातीकरीता अ ब क ड प्रवर्गामधील आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय राहील.

**२. पात्रताविषयक अटी :-**

(१) उमेदवार भारतीय नागरिक व महाराष्ट्र राज्याचा अधिवासी (Domiciled) असावा

(२) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे

(३) शैक्षणिक अर्हता

१) **संशोधन सहायक**

अ] मान्यताप्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी /बायोमेट्री /गणित /अर्थशास्त्र / इकॉनॉमेट्रीक्स /गणिती अर्थशास्त्र / वाणिज्य या विषयातील पदव्युत्तर पदवी **किंवा**

ब] मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील किमान द्वितीय श्रेणी किंवा ४५% गुणांसह पदवी आणि भारतीय सांख्यिकीय संस्था (I.S.I.) किंवा भारतीय कृषी संशोधन परिषद (I.C.A.R.) किंवा शासन मान्य संस्था यातील जिच्या प्रवेशासाठी किमान अर्हता पदवी आहे अशी संख्याशास्त्रातील पदव्युत्तर पदविका.

वरील अर्हतेनंतर सांख्यिकी/सामाजिक-आर्थिक पाहणीशी संबंधित क्षेत्रिय कामाचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य

२) **सांख्यिकी सहायक**

अ] गणित /अर्थशास्त्र /वाणिज्य /सांख्यिकी /इकॉनॉमेट्रिक्स या विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी.

**किंवा**

ब] गणित /अर्थशास्त्र /वाणिज्य /सांख्यिकी /इकॉनॉमेट्रिक्स या विषयातील मान्यता प्राप्त विद्यापीठाची द्वितीय श्रेणी किंवा ४५% गुणांसह पदवी

वरील अर्हतेनंतर सांख्यिकी/सामाजिक-आर्थिक पाहणीशी संबंधित क्षेत्रिय कामाचा प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या कर्मचाऱ्यास प्राधान्य

३) **अन्वेषक :** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक तसेच गणित / अर्थशास्त्र / वाणिज्य / सांख्यिकी या विषयातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी असल्यास प्राधान्य

४) **लिपिक टंकलेखक :** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण व मराठी ३० प्र.श.मी. गतीचे टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक

५) **वाहनचालक :** पदासाठी इयता ४ थी उत्तीर्ण व मोटार वाहन अधिनियम १९३९ अंतर्गत जड वाहन अथवा मोटार कार अथवा जीप चालविण्याचा वैध परवाना धारण करणे आवश्यक व ३ वर्षे इतक्या कालावधीचा अनुभव असावा.

६) **चपराशी :** पदासाठी इयत्ता ४ थी उत्तीर्ण

**३. अतिरिक्त आवश्यक अर्हता:-**

१ संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपीक टंकलेखक पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक:प्रशिक्षण-२०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९/०३/२००३ नुसार संगणक हाताळणी/वापराबाबतचे खालील नमूद केलेले प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्ती दिनांकापासून २ वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील अन्यथा त्यांची सेवा समाप्त होईल.

[अ] D.O.E.A.C.C. सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तरापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र **किंवा**

[ब] महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT अथवा GECT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदरचे प्रतिज्ञापन अर्जासोबत प्राप्त न झाल्यास संबंधित उमेदवाराचा अर्ज रद्द करण्यात येईल. अविवाहित उमेदवारांनीसुध्दा प्रतिज्ञापनात अविवाहित असल्याचे नमूद करून प्रतिज्ञापन सोबत सादर करणे बंधनकारक आहे.

३ अपंग प्रवर्गातील उमेदवारांनी शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:अपंग-१००३/प्र.क्र.१२७/२००३/१६-अ, दिनांक ६/५/२००४ व भारत सरकार, कार्मिक मंत्रालय, ज्ञापन दिनांक २९/१२/२००५ अन्वये विहित केलेले राज्य शासन प्राधिकृत तज्ञ वैद्यकीय मंडळाने दिलेले अपंगत्व प्रमाणपत्र (Disability Certificate) अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील. ४० टक्के पेक्षा कमी अपंगत्व असलेल्या उमेदवारांना अपात्र ठरविण्यात येईल. **तसेच**

. शासन निर्णय सामाजिक न्याय विशेष सहाय विभाग दिनांक १५/१०/२०११ व शासन निर्णय नियोजन विभाग दिनांक २१/२/२०११ अन्वये **अपंगत्व** असलेले पुढील प्रवर्गातील उमेदवार प्रस्तुत पदास अर्ज करण्यास पात्र असतील.

अ] संशोधन सहायक पदासाठी अंधत्व (B), क्षीणदृष्टी (LV), श्रवणशक्तीतील दोष (HI), एका हाताने अपंग (OA) व एका पायाने अपंग (OL) असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

ब] सांख्यिकी सहायक पदासाठी अंधत्व (B), क्षीणदृष्टी (LV), श्रवणशक्तीतील दोष (HI), एका पायाने अपंग असलेले (OL) व दोन्ही पायाने अपंग असलेले (BL) उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

क] अन्वेषक पदासाठी क्षीणदृष्टी (LV), श्रवणशक्तीतील दोष (HI), एका हाताने अपंग (OA) व एका पायाने अपंग (OL) असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

ड] लिपिक टंकलेखक पदासाठी अंधत्व (B), क्षीणदृष्टी (LV), श्रवणशक्तीतील दोष (HI), एका हाताने अपंग (OA), एका पायाने अपंग (OL), दोन्ही पायाने अपंग (BL), एक हात आणि एक पायाने अपंग (OA & OL) उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

इ] वाहनचालक पदासाठी अपंग उमेदवार पात्र असणार नाहीत.

फ] चपराशी पदासाठी अंधत्व (B), क्षीणदृष्टी (LV), श्रवणशक्तीतील दोष (HI), एका हाताने अपंग व एका पायाने (OA & OL) अपंग असलेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र असतील.

**४ वयोमर्यादा** :-

१) वर नमूद करण्यात आलेल्या सर्व पदांसाठी **दिनांक १/१०/२०१२ रोजी** किमान १८ वर्ष पूर्ण असावे. कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३३ वर्ष व मागासवर्गीयांसाठी कमाल मर्यादा ३८ वर्ष राहील.

२) माजी सैनिकांसाठी वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील. उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

३) अपंग, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त यांचेसाठी उच्च वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत राहील.

४) पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.

५) राष्ट्रीय खेळाडूसाठी ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

**५ सवलती :-**

१. परीक्षा शुल्कात सवलतीचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत

अ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० (सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३) मधील कलम क्रमांक ३ खालील परंतुकातील तरतुदीनुसार मागासप्रवर्गाच्या दाव्याच्या अनुषंगाने मागणी केलेल्या लाभाची पडताळणी करण्यासाठी उमेदवाराच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी होणे आवश्यक आहे. याबाबत नियुक्तीच्यावेळी लागू असलेल्या शासन नियमांनुसार कार्यवाही केली जाईल.

ब महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८) मधील कलम क्रमांक ४(२) (दोन) खालील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअर) तत्व वि.जा.[अ], भज [ब], भज [क], भज [ड], विमाप्र व इमाव या प्रवर्गाना लागू करण्यात आले आहे. त्यानुसार शासन निर्णय सामाजिक न्याय सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग क्रमांकःसीबीसी-१०/२००८/प्र.क्र. ६९७/मावक-५, दिनांक १३ जानेवारी, २००९ नुसार सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी वर्ष २०१२-२०१३ या कालावधीकरीता वैध असलेले (अर्थात दिनांक १/४/२०१२ रोजी अथवा तद्नंतर निर्गमित केलेले) उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास मुलाखतीवेळी सादर करणे बंधनकारक राहील, अन्यथा अपात्र समजले जाईल.

२ माजी सैनिकांनी जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. तसेच अर्जासोबत सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले सैनिकी सेवेसंदर्भातील प्रमाणपत्र सोबत सादर करणे आवश्यक आहे अन्यथा अनुषंगिक सवलती मिळण्यास पात्र होणार नाही.

**६. सर्वसाधारण अटी :-**

१. उमेदवारांना लेखी परीक्षेला तसेच मौखिक परीक्षेला येण्या-जाण्याचा प्रवास खर्च वा इतर खर्च दिला जाणार नाही.

२. शासन निर्णय क्रमांक रिपभ/प्र.क्र. ६६/ई-१० दिनांक २७ जून, २०११ नुसार ज्या परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

उमेदवारांकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्मतारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील परतु दाखल्यावर उमेदवाराचा जन्म महाराष्ट्रात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणात अधिवास प्रमाणपत्र असण्याची आवश्यकता असणार नाही.

उपरोक्त बाबी महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या उमेदवारांसाठी लागू राहतील. इतर उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र आवश्यक राहील.

३. सामान्य प्रशासन विभाग क्रमांक पअंक/१०१०/७१७/प्र.क्र. ३२२/१०/१६ अ दि. २६ ऑगस्ट २०१० अन्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्यास समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास पुन्हा लाभ देता येणार नाही.

४. महिला आरक्षण हे शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१ मसेआ-२०००/प्र.क्र. ४१५/का-२ दिनांक २५-५-२००१ मधील तरतूदीनुसार राहील. खुल्या प्रवर्गातील महिलांना उन्नत व प्रगत व्यक्ती व गट यामध्ये मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकारी यांचे अद्यावत प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

५. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. रक्रीधो २००२/प्र.क्र. ६८/क्रीयुसे-२ दिनांक ३०-४-२००५ मधील तरतूदीनुसार राहील.

६. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावामधील मराठी भाषीक उमेदवारांना शासन परिपत्रक क्र. मकसी १००७/प्र.क्र. ३६/का-३६ दिनांक १०-७-२००८ मधील तरतूदी लागू राहतील.

७. शासकीय नोकर भरतीला लागू असणारे सर्व नियम या भरतीला लागू असतील.

८. शासन निर्णय, क्रमांकःअंनियो-१००५/१२५/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ मधील तरतुदींनुसार दिनांक १/११/२००५ नंतर नियुक्तीसाठी पात्र ठरणाऱ्या कर्मचाऱ्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील. मात्र, सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना [म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम, १९८४] आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही.

९. वयाच्या पुराव्यासाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र किंवा सक्षम प्राधिकारी / दंडाधिकारी यांनी दिलेले विहित नमुन्यातील वयाचे प्रमाणपत्र, शासनाच्या किंवा शासनाच्या स्थायी सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सेवाअभिलेखातील जन्मदिनांक नोंदविलेल्या अभिलेखाची प्रमाणित उताऱ्याची प्रत सोबत जोडणे आवश्यक राहील.

१०. शैक्षणिक अर्हतेचा पुरावा म्हणून जाहिरातीत नमूद अर्हतेच्या गुणपत्रक व प्रमाणपत्र यांच्या प्रती सादर करणे आवश्यक राहील.

११. विवाहित स्त्रियांच्या नावात बदल झालेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र यांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे.

१२. विहित अर्हता व वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही. जाहिरातीच्या दिनांकास विहित अर्हता व वयोमर्यादा नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करू नये.

१३. न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक वा तत्सम इत्यादी कारवाईसंबंधीची माहिती अर्जातील संबंधित परिच्छेदात नमूद करावी. नमूद केलेल्या माहितीमध्ये अर्ज सादर केल्यापासून निवड प्रक्रिया संपेपर्यंतच्या काळात घडणारे बदल उमेदवाराने संचालनालयास वेळोवेळी कळविणे आवश्यक राहील. ही माहिती न दिल्यास तसेच त्यात नंतर घडून आलेले बदल उमेदवाराने संचालनालयास न कळविल्यास अशा उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार संचालनालयास राहतील.

१४. संचालनालयातील संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, लिपिक टंकलेखक, वाहनचालक, चपराशी ही सर्व पदे राज्यस्तरीय असल्याने निवड झालेले उमेदवार राज्यात कोठेही नियुक्ती / बदलीस पात्र राहतील.

१५. उमेदवाराने जाहिरातीतील पदासाठी विहित अर्हता धारण केली म्हणजे त्यास लेखी परीक्षेस/मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवार विहित अर्हता धारण करीत नाही असे आढळल्यास, गैरवर्तन करताना आढळल्यास, दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास त्यांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवारांची नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१६. अंशकालीन कर्मचाऱ्यांनी / उमेदवारांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. तसे पुरावे अर्जासोबत जोडावे व अर्जामध्ये अनुभवाचा कालावधी नमूद करावा.

**१७. रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची तसेच आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे तसेच संपूर्ण भरती प्रक्रीया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार संचालनालय राखून ठेवत आहे.**

१८. निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर उमेदवाराने खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास अथवा उमेदवार अपात्र असल्याचे आढळल्यास उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

## ७. परिक्षा शुल्क :-

उमेदवारांना खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

| **पदाचे नाव** | खुला प्रवर्ग | मागासवर्गीय प्रवर्ग |
|---|---|---|
| संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, वाहनचालक, चपराशी | रु. ४००/- | रु. २००/- |
| लिपिक-टंकलेखक | रु. ३००/- | रु. १५०/- |
| माजी सैनिक | परीक्षा शुल्क नाही | |

अ) सशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक व लिपिक-टंकलेखक पदासाठी on-line पध्दतीने अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी वर निर्दिष्ट केलेले परीक्षा शुल्क DIRECTOR, DIRECTORATE OF ECONOMICS AND STATISTICS, MUMBAI यांच्या नावे असलेल्या खाते क्र. ३२६११३०७४४३ मध्ये स्टेट बॅक ऑफ इंडीयाच्या कोणत्याही शाखेत चलनाव्दारेच रोखीने भरणे आवश्यक आहे.

ब) वाहनचालक व चपराशी पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी वर निर्दिष्ट केलेले परीक्षा शुल्क DIRECTOR, DIRECTORATE OF ECONOMICS AND STATISTICS, MUMBAI यांच्या नावे Payable at MUMBAI असलेल्या कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेच्या रेखांकित केलेल्या डिमांड ड्राफ्टच्या स्वरुपात सोबत जोडणे आवश्यक आहे. डिमांड ड्राफ्टच्या पाठीमागील बाजूस उमेदवाराने स्वतःचे नाव, अर्ज सादर केलेल्या पदाचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज नाकारल्यास अथवा अन्य कारणास्तव परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही. **कोर्ट फी स्टँप/पोस्टल ऑर्डर वा अन्य कोणत्याही स्वरूपात परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही, असे परीक्षा शुल्क सादर केलेले अर्ज नाकारण्यात येतील.**

**८. वाहनचालक व चपराशी पदाकरीता अर्ज करण्याची पध्दत : -**

(१) **वाहनचालक व चपराशी** पदाकरीता अर्ज करणाऱ्या इच्छूक व पात्र उमेदवारांनी सोबत दिलेल्या नमुन्यात A४ आकाराच्या पांढऱ्या जाड कागदावर एका बाजूस टंकलिखित अथवा मुद्रीत करून सुवाच्च्य अक्षरात भरलेला अर्ज सादर करावा.

(२) अर्जाचा समावेश असलेल्या लिफाफ्यावर वरील बाजूस ठळक अक्षरात " ------------" पदाकरीता अर्ज असे नमूद करण्यात यावे. परिपूर्ण अर्ज दिनांक ९/११/२०१२ रोजी अथवा तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत खालील पत्त्यावर पोहचतील अशा रितीने पाठविण्यात यावेत.

**अर्थ व सांख्यिकी संचालनालय**
**महाराष्ट्र शासन, प्रशासकीय इमारत,**
**८ वा मजला, मुंबई उपनगर जिल्हा,**
**शासकीय वसाहत, वांद्रे [पूर्व], मुंबई ४०० ०५१.**

(३) दिनांक ९/११/२०१२ नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तद्वतच पोष्टाच्या दिरंगाईमुळे अर्ज प्राप्त होण्यास उशिर झाल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(४) उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे. एकापेक्षा जास्त पदासाठी एकच अर्ज वापरल्यास असा अर्ज नाकारण्यात येईल.

(५) उमेदवाराने विहित नमुन्यातील अर्जावर ओळखपत्राच्या आकाराचे स्वतःचे अलिकडील काळातील छायाचित्र चिकटविणे आवश्यक आहे.

(६) **उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचे तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे दिनांक १/४/२०१२ नंतरचे (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. तसेच उमेदवाराने अर्जासोबत कोणत्याही प्रमाणपत्राच्या मूळ प्रती जोडू नये.**

(७) शासकीय/निम शासकीय/शासकीय उपक्रम यातील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज परस्पर विहीत मुदतीत दिलेल्या पत्त्यावर पोहचतील याची दक्षता घ्यावी. तथापि मुलाखतीवेळी विभागप्रमुखाचे ना हरकत/परवानगी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(८) सदोष अर्ज :- खालील नमूद केलेल्या कारणामुळे सदोष अर्ज नाकारले जातील.

[अ] वाहनचालक व चपराशी पदाकरीता या जाहिरातीत दिलेल्या विहित नमुन्यानुसार नसलेले अर्ज.
[ब] अर्जावर स्वतःचे छायाचित्र चिकटवलेले नसल्यास.
[क] सुवाच्च नसलेले, अपूर्ण किंवा चुकीची किंवा विसंगत माहिती भरलेले किंवा स्वाक्षरी नसलेले अर्ज
[ड] विहित मुदत दिनांक ९/११/२०१२ नंतर प्राप्त झालेले अर्ज.
[इ] एकापेक्षा जास्त पदासाठी केलेला एकच अर्ज
[फ] विहित अर्हता धारण करीत नसलेले अर्ज.
[ग] परिक्षा शुल्काच्या विहित रकमेचे डिमांड ड्राफ्ट न जोडलेले अर्ज (माजी सैनिक वगळून)
[ह] लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र सोबत न जोडलेले अर्ज.
[ज] शैक्षणिक अर्हता, वय, अपंगत्व, माजी सैनिक असल्याबाबत, मागासवर्गीय असल्याबाबत, वाहनचालकाचा परवाना इत्यादी बाबतचे प्रमाणपत्र न जोडलेले अर्ज.

९. सदरहू जाहिरातीला अनुसरून ज्या उमेदवारांचे अर्ज विहित मुदतीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील.

१०. सदर जाहिरातीतील उल्लेख केलेली वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अटी संबंधित पदासाठी आवश्यक असलेली पात्रता दर्शवितात. उपलब्ध पदांच्या तुलनेत प्रथमदर्शनी अर्हताप्राप्त उमेदवारांच्या अर्जाची संख्या जास्त असल्यास परिस्थितीनुसार निकष ठरवून व लेखी परीक्षा घेऊन मुलाखतीला बोलवावयाच्या उमेदवारांची संख्या गुणवत्तेनुसार मर्यादित केली जाईल. निकष ठरवितांना उमेदवारांकडील उच्च अर्हता आणि / किंवा अनुभव विचारात घेण्यात येईल.

संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, लिपिक टंकलेखक, या पदांसाठी लेखी परीक्षा २०० गुणांची राहील.

- वाहनचालक पदासाठी ५० गुणांची लेखी परीक्षा व ४० गुणांची व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल.
- चपराशी पदाकरीता लेखी परीक्षा ७५ गुणांची राहील.

११. **सदर परीक्षेचे स्वरूप खालीलप्रमाणे असेल.**

**अ] संशोधन सहायक व सांख्यिकी सहायक** पदांकरीता परीक्षेचा दर्जा मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रत्येकी ५० गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

**ब] अन्वेषक, लिपिक टंकलेखक** पदाकरीता परीक्षेचा दर्जा माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल. लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयावरील प्रत्येकी ५० गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी प्रश्न असतील.

लिपिक-टंकलेखक पदासाठी फक्त लेखी परीक्षेच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

**क] वाहनचालक** पदासाठी ५० गुणांच्या लेखी परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांची ४० गुणांची व्यावसायिक चाचणी व १० गुणांची मुलाखत घेण्यात येईल. प्राप्त गुण एकत्रित करून गुणानुक्रमानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेचा दर्जा इयत्ता ४ थी परीक्षेसमान असेल.

**ड] चपराशी** पदांकरिता ७५ गुणांचे वस्तुनिष्ठ, बहुपर्यायाची प्रश्न असतील. लेखी परीक्षेचा दर्जा इयत्ता ४ थी परीक्षेसमान असेल.

- संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, व चपराशी या पदांसाठी लेखी परीक्षेअंती पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची २५ गुणांची मुलाखत घेण्यात येईल. लेखी परीक्षा व मुलाखत यातील प्राप्त गुण एकत्रित करून गुणानुक्रमानुसार उमेदवारांची निवड करण्यात येईल.

विहित नमुन्यानुसार/निकषानुसार अर्ज नसल्यास सदर अर्ज नाकारण्याचा अधिकार संचालनालय स्वतःकडे राखून ठेवत असून यासंदर्भात उमेदवारास काहीही कळविण्यात येणार नाही.

१२. पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

१३. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या विविध सवलती, अटी, शर्ती सदर भरती प्रकियेसाठी लागू राहतील व त्याचे पालन करण्यात येईल.

१४. निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार अपात्र ठरविला जाईल.

**विशेष सूचना**

१ संचालनालयाच्या दिनांक ४/३/२०१२ रोजी प्रसिध्द झालेल्या मागासवर्गीयांच्या अनुशेषाची पदे भरतीबाबत दिलेल्या जाहिरातीस अनुसरून ज्या मागासवर्गीय उमेदवारांनी संशोधन सहायक, सांख्यिकी सहायक, अन्वेषक, लिपिक टंकलेखक व चपराशी पदाकरीता अर्ज भरले असतील त्यातील पात्र उमेदवारांना पुन्हा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने **पात्र / अपात्र** ठरलेल्या व विहित मुदतीनंतर विलंबाने अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. अर्ज केलेल्या उमेदवाराने आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी.

२ खाजगी संस्थानी छापलेल्या अर्ज नमुन्याचा वापर करण्यापूर्वी उमेदवारांनी http://mahades.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरील अर्ज नमुन्याशी पडताळून पहावा व नंतरच अर्ज संचालनालयाकडे सादर करावा. चुकीचा अर्ज नमुना वापरल्यामुळे अर्ज नाकारले जाण्याची शक्यता आहे. अशा प्रकरणी सर्व जबाबदारी उमेदवारांची राहील, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
मुंबई.

## अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई

नामनिर्देशनाच्या **वाहनचालक व चपराशी** पदाकरीता रिक्त पदे भरतीबाबतचा अर्ज

**टीप** :-अर्ज भरण्यापूर्वी जाहीरातीतील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. अर्जातील माहिती उमेदवाराने स्वत:च्या हस्ताक्षरात काळजीपूर्वक भरावी . एकदा भरलेल्या माहितीत बदल करण्यास परवानगी मिळणार नाही.

| | | |
|---|---|---|
| उमेदवाराने जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे ओळखपत्राच्या आकाराचे स्वत:चे अलीकडच्या काळातील छायाचित्र येथे घट्ट चिकटवावे. | संचालनालयाने भरावयाचा मजकूर | नोंदणी क्रमांक<br>आसन क्रमांक |

संगणकावरील माहिती संस्करणासाठी उमेदवारांनी उजव्या बाजूस इंग्रजीत BLOCK CAPITALS अक्षरात माहिती भरावी

१. पदाचे नाव
(जाहिरातीतील परिच्छेद १ पहावा.)

२. उमेदवाराचे

आडनाव :- ----------------------------------------

स्वत:चे नाव :- --------------------------------------

वडिलांचे/पतीचे नाव :- --------------------------------

आईचे संपूर्ण नाव :- ----------------------------------

२. Candidates

Surname :- -----------------------------------------

Name :- ---------------------------------------------

Fathers/Husbands Name :- ----------------------------

Mothers Full Name :- -------------------------------

३. उमेदवाराचा निवासी पत्ता :- ---------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

३. Candidates Residential Address :- ----------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

----------------------------------------------------

पिन कोड | | | | | | |  Pin Code | | | | | | |

खालीलपैकी उमेदवारास लागू असलेल्या चौकटीमध्ये √ अशी खूण करावी
(चुकीच्या जागी खूण केल्यास उमेदवार अपात्र ठरू शकेल)

४. अ] उमेदवार पुरूष आहे की स्त्री आहे ?

| पुरूष | स्त्री |
|---|---|
| १ | २ |

ब] वैवाहिक स्थिती

| विवाहित | अविवाहित |
|---|---|
| १ | २ |

क] अपत्यांची संख्या

| एक अपत्य | दोन अपत्य | दोन पेक्षा अधिक अपत्य | लागू नाही |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

५. महाराष्ट्र राज्याचे अधिवासी (डोमिसाईल्ड) आहात काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

६. जातीविषयक कोणती वर्गवारी लागू आहे ? √ अशी खूण करावी

| अ.जा. | अ.ज. | उन्नत व प्रगत गटात न मोडणारे | | | | | | अमागास (खुला) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | वि.जा.[अ] | भ.ज.[ब] | भ.ज.[क] (धनगर व तत्सम) | भ.ज.[ड] (वंजारी व तत्सम) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | |
| S.C. | S.T. | V.J. (A) | N.T. (B) | N.T.(C) | N.T.(D) | S.B.C. | O.B.C. | Open |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

जात/जमात नमूद करावी --------------------------

७. अ] उमेदवार उन्नत व प्रगत गटात (क्रिमीलेअर) मोडतो काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

ब] मोडत नसल्यास तसे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडले आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

८. **डिमांड ड्राफ्टच्या स्वरूपात पाठविलेले शुल्क**

राष्ट्रीयकृत बँकेचे नाव व शाखा --------------------------------------------

| रु. /- | माजी सैनिक |
|---|---|

डिमांड ड्राफ्ट क्रमांक व दिनांक --------------------------------------------

९. अ] उमेदवार लष्करातील माजी सैनिक आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

ब] असल्यास, शासनाच्या सेवेत माजी सैनिक सवलतीचा फायदा घेऊन नियुक्त झाला आहात काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

क] सैनिक सेवेचा कालावधी वर्षे ------------------ महिने -------------------- दिवस ---------------

१०. अ] उमेदवार शारिरीकदृष्टया अपंग आहे काय ?
असल्यास अपंगत्व कोणत्या प्रकारचे आहे

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

| अंधत्व (B) | क्षीणदृष्टी (LV) | श्रवणशक्तीतील दोष (HI) | एका हाताने अधू (OA) | एका पायाने अधू (OL) | दोन्ही पायाने अधू (BL) | एका हाताने व एका पायाने अधू (OA & OL) | इतर ------- |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

ब] अपंगत्वाचे प्रमाण ________ टक्के

| ४०% अथवा त्यापेक्षा जास्त | ४०% पेक्षा कमी |
|---|---|
| १ | २ |

११. जन्मदिनांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | १ | ९ | | |
| तारीख | | महिना | | वर्ष | | | |

१२. दिनांक १/१०/२०१२ रोजी वय [ ] वर्षे [ ] महिने [ ] दिवस

१३. जन्मठिकाण :- गाव/शहर ------------ तालुका ----------- जिल्हा --------- राज्य ------------

१४. सेवायोजना कार्यालयात नोंदणी असल्यास कार्यालयाचे मुख्यालय [ ] नोंदणी क्रमांक [ ]

१५. शैक्षणिक अर्हतेचा तपशिल

| अ.क्र. | पदवी/प्रमाणपत्र | विषय | शाळा / मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्के वारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | इयत्ता ४ थी | | | | | | |
| २) | दहावी (S.S.C.) | | | | | | |
| ३) | बारावी (H.S.C.) | | | | | | |
| ४) | (पदवी नमूद करावी) ------------------- | | | | | | |
| ६) | इतर ------------- | | | | | | |

१६. अ] उमेदवार सध्या सेवेत आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| १ | २ |

ब] असल्यास

| राज्य शासकीय | केंद्र शासकीय | जिल्हा परिषद/ नगर पालिका/ महानगरपालिका | शासन अनुदानित संस्था | शासकीय महामंडळ | खाजगी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |

१७. अनुभव असल्यास

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव | पदनाम व वेतनमान | सेवेचा कालावधी | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१८. उमेदवारास यापूर्वी शालांत, विद्यापीठ, राज्य किंवा संघ लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस प्रतिरोधीत/ Debar केले आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |
| १ | २ |

१९. अ] हा अर्ज भरतेवेळी उमेदवाराविरूध्द बार कौन्सिल अथवा इतर व्यावसायिक संस्था अथवा शासकीय/निम शासकीय कार्यालयामार्फत शिस्तभंगाची कारवाई सुरू आहे काय ? किंवा न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ? अथवा कोणतेही फौजदारी प्रकरण प्रलंबित आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |
| १ | २ |

ब] उत्तर होय असल्यास प्रलंबित प्रकरण /कारवाई बाबतचा तपशील द्यावा -------------------------

## उमेदवाराने स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

मी, असे प्रमाणित करतो /करते की, अर्थ व सांख्यिकी संचालनालयाची जाहिरात मी काळजीपूर्वक वाचली आणि मला समजली. सदर पदासाठी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तीची मी पूर्तता करतो/करते याची मी खात्री केली आहे. या अर्जात दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व खरी आहे. तसेच अर्जात दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळल्यास त्याच माहितीच्या आधारे मला निवड प्रक्रियेत दिलेला प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल, परिणामी मिळालेली नोकरी गमविण्यास मी बाध्य राहीन व पुढील योग्य त्या कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

दिनांक ----------------------------- उमेदवाराची मराठी स्वाक्षरी ------------------------------

ठिकाण ------------------------------ उमेदवाराची इंग्रजीत स्वाक्षरी ------------------------------

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार

अर्जासोबत जोडावयाच्या लहान कुटूंबाच्या प्रतिज्ञापनाचा नमुना

प्रतिज्ञापन

नमुना - अ

(नियम ४ पहा)

मी श्री./श्रीमती ------------------------------------------------------------------------------------------ श्री.------------------------------------------------------------------------------------------ यांचा/यांची मुलगा/मुलगी/पत्नी, वय -------------- वर्षे, राहणार ------------------------------------------------------------ ------------------------------------------------------------------ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ------------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ------------------ (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------------------------------- आहे. (असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यात पात्र होईन याची मला जाणीव आहे.

ठिकाण : (उमेदवाराची स्वाक्षरी )

दिनांक :

महत्वाची सूचना : (१) अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या छायाप्रती जोडाव्यात. (२) उमेदवाराने संचालनालयाकडे अर्ज सादर करण्यापूर्वी खालील बाबींची पूर्तता केली आहे याची खातरजमा करून घ्यावी.

CHECKLIST

१) अर्ज : जाहिरातीतील नमुन्यानुसारच आहे

२) अर्जावर अलिकडील छायाचित्र चिकटविले आहे.

३) अर्जासोबत विहित रकमेची फी जोडली आहे.

४) अर्जासोबत लागू असेल त्याप्रमाणे खालील प्रमाणपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडलेल्या आहेत.

अ - वय व अधिवास प्रमाणपत्र.

ब - शैक्षणिक प्रमाणपत्रे व गुणपत्रिका

क - अपंगत्व प्रमाणपत्र.

ड - मागासप्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

इ - उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.

फ - माजी सैनिक असल्यास त्याबाबतची प्रमाणपत्रे.

ग - रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत

ह - वाहन चालक पदासाठी वाहन परवाना व अनुभव प्रमाणपत्र जोडले आहे.

५) अर्जातील माहिती पूर्णपणे व बिनचूक भरली आहे.

६) अर्जावर मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषेत स्वाक्षऱ्या केल्या आहेत

---

कार्यालयीन उपयोगासाठी

अर्ज छाननी अधिकारी / कर्मचा-याचे नाव :- ____________________

पदनाम :- ____________________

अर्ज स्विकारला जाण्यास पात्र किंवा अपात्र :- ____________________

अपात्र असल्यास अपात्र असल्याचे कारण :- ____________________

____________________

____________________

अर्ज छाननी अधिकारी / कर्मचाऱ्याची स्वाक्षरी ____________________

पुनःतपासणी अधिकाऱ्याची स्वाक्षरी ____________________

# Challan

| Cash Only | उमेदवाराची प्रत |
|---|---|

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

Challan for Examination Fee for
Recruitment-२०१२-१३
Group B/C

Applicantङs Name:

Application No.

Post Name:

Deposit Date:

Last Deposit Date: 09/11/2012

Paid into Credit of संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मंबई
A/C No.**32611307443**

**Category:**

| | |
|---|---|
| A) Exam Fee in cash | Rs. |
| B) Commission/Bank Charges | Rs. |
| | |
| # Total (A+B) | Rs. |

For Bank Use Only
Journal No.:(Only Numeric)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| Signature of Bank's Official | Signature of Candidate/Depositor |
|---|---|

Please tear from here

Please tear from here

# Challan

| Cash Only संचालनालयाची प्रत |
|---|

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

Challan for Examination Fee for
Recruitment-२०१२-१३
Group B/C

Applicantङs Name:

Application No.

Post Name:

Deposit Date:

Last Deposit Date: 09/11/2012

Paid into Credit of संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मंबई
A/C No.**32611307443**

**Category:**

| | |
|---|---|
| A) Exam Fee in cash | Rs. |
| B) Commission/Bank Charges | Rs. |
| | |
| # Total (A+B) | Rs. |

For Bank Use Only
Journal No.:(Only Numeric)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| Signature of Bank's Official | Signature of Candidate/Depositor |
|---|---|

Please tear from here

Please tear from here

# Challan

| Cash Only | बँकेची प्रत |
|---|---|

महाराष्ट्र शासन नियोजन विभाग
अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई

Challan for Examination Fee for
Recruitment-२०१२-१३
Group B/C

Applicant's Name:

Application No.

Post Name:

Deposit Date:

Last Deposit Date: 09/11/2012

Paid into Credit of संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मंबई
A/C No.**32611307443**

**Category:**

| | |
|---|---|
| A) Exam Fee in cash | Rs. |
| B) Commission/Bank Charges | Rs. |
| | |
| # Total (A+B) | Rs. |

For Bank Use Only
Journal No.:(Only Numeric)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

| Signature of Bank's Official | Signature of Candidate/Depositor |
|---|---|